**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**


**अंक ५५/२०२०** **दिनांक १०/०७/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| डॉ. प्रशांत बोडके, | डॉ. विजय मोरे, |
|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०४/०७/२०२० ते १०/०७/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ११/०७/२०२० सकाळी ८:३० पासून १५/०७/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४/०७ | ०५/०७ | ०६/०७ | ०७/०७ | ०८/०७ | ०९/०७ | १०/०७ | | ११/०७ | १२/०७ | १३/०७ | १४/०७ | १५/०७ |
| १४.६ | ११४.८ | ४९.६ | ६५.४ | ५७.२ | ३५.२ | - | पाऊस (मिमी) | ४० | ३४ | ४३ | ४३ | ५८ |
| २९.८ | २९.८ | २८.६ | ३१.८ | २९.८ | ३०.२ | - | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३२ |
| २४.५ | २३.५ | २३.५ | २३.४ | २३.६ | २५.२ | - | किमान तापमान (अं.से) | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ८९ | ८८ | ८२ | ८६ | ८९ | ९० | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९२ | ९१ | ९१ | ९२ | ९४ |
| ८९ | ९५ | ८७ | ७५ | ८५ | ९३ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ८० | ८० | ८० | ८२ | ८८ |
| ५.३ | ६.९ | ८.२ | ९.६ | ६.८ | ४.७ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | १३ | १२ | ८ | ६ |
| ई.ऊ. | ऊ. | ई.ऊ. | ऊ. | ऊ. | ऊ. | - | वाऱ्याची दिशा | नै.द. | नै. | नै. | नै. | नै. |
| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | | | | | | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | | | | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा | | |
| ३३६.८ | | | | | | ७९२.२ | | | | ५१९७.२ | | |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ११ ते १५ जुलै, २०२० दरम्यान रायगड जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे.**

**इशारा: दिनांक ११ ते १४ जुलै २०२० दरम्यान जिल्ह्यातील तुरळक (१ किंवा २) ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.**

**विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक १५ ते २१ जुलै २०२० दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **पुर्नलागवड** | • लावणीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत भात खाचरात पाण्याची पातळी २.५ ते ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• भात पुर्नलागवडीची कामे पूर्ण करून घ्यावीत. पुर्नलागवड करावयाच्या खाचरामध्ये चिखलणी करावी. चिखलणीच्या वेळेस पाऊसाची तीव्रता कमी असताना एकरी ३५ कि.ग्रॅ. युरिया, १२५ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट आणि ३४ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावे. एकरी २ टन गिरीपुष्पाचा पाला चिखलणीच्या वेळीस दिल्यास ५० टक्के नत्र खताची (युरिया) मात्रा कमी करून द्यावी. हळव्या भात जातींसाठी २० ते २१ दिवसांची आणि निमगरव्या व गरव्या जातींसाठी २७ ते ३० दिवसांची तसेच १२ ते १५ सें.मी. उंचीची आणि पाच ते सहा पाने फुटलेल्या रोपांची पुर्नलागवड करावी.<br>• भात पिकाची पुर्नलागवड १५ X १५ सें.मी. (हळव्या जातींसाठी) किंवा २० X १५ सें.मी. (निमगरव्या व गरव्या जातींसाठी) अंतरावर करावी. लावणी सरळ आणि उथळ २.५ ते ३.५ सें.मी. खोल करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडामध्ये दोन ते तीन रोपे लावावीत आणि संकरीत भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे.<br>• बांधावरील खेकड्यांच्या नियंत्रणासाठी विषारी आमिषाचा वापर करून खेकड्यांचे नियंत्रण करावे. १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत आमिष वापरावे. विषारी आमिषाचा वापर सांघिकरीत्या व एकाच वेळी केल्यास खेकड्यांचे नियंत्रण करण्यास मदत होईल. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही). |
| **नागली** | **पुर्नलागवड** | • पाऊसाची तीव्रता कमी असताना नागली पिकाची पुर्नलागवडीची कामे हाती घ्यावीत. पुर्नलागवडीच्या वेळेस एकरी ३५ कि.ग्रॅ. युरिया आणि १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट खताची मात्रा फोकून न देता ठोंब्यातून दयावी. रोपे उताराच्या आडव्या दिशेने ठोंबा पध्दतीने उथळ आणि उभी लावावीत. ३० दिवसांची रोपे एका ठोंब्यात दोन या प्रमाणे दोन ओळीत २० सें.मी. आणि दोन रोपात १५ सें.मी. अंतर ठेवून लावावीत. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • ढगाळ पावसाळी वातावरणामुळे आंब्याच्या नवीन आलेल्या कोवळ्या पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथिल पा.वि.भु. ०.१ टक्के १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• निसर्ग चक्रीवादळातील नुकसान ग्रस्त आंबा बागेमधील पुर्नस्थापित झाडांचे बुरशीजन्य रोगापासून आणि खोडकिडी पासून संरक्षण करण्यासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण आणि कलोरपायरीफॉस २०% प्रवाही २ मि. ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून स्वतंत्र द्रावणाची दुसरी फवारणी करावी. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • निसर्ग चक्रीवादळातील नुकसान ग्रस्त काजू बागेमधील पुर्नस्थापित झाडांचे बुरशीजन्य रोगापासून आणि खोडकिडी पासून संरक्षण करण्यासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण आणि कलोरपायरीफॉस २०% प्रवाही २ मि. ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून स्वतंत्र द्रावणाची दुसरी फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| **वांगी** | **वाढीची अवस्था** | • वांगी पिकास नत्र खताची दुसरी मात्रा एकरी ४३ कि.ग्रॅ. युरिया रोपांच्या पुर्नलागवडीनंतर ३ ते ५ आठवड्यानी देण्यात यावी. |
| **हळद** | **वाढीची अवस्था** | • हळद पिकास नत्र खताची पहिली मात्रा एकरी ३५ कि.ग्रॅ. युरिया लागवडीनंतर ६ आठवड्यानी देण्यात यावी. खते हळदीच्या ओळीलगत चर घेऊन त्यात टाकून मातीने झाकून घ्यावीत. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | **-** | • पावसाळ्याच्या दिवसात जनावरांमध्ये जंताचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते यावेळी जनावरांना पातळ संडास होणे, खाणे कमी होणे तसेच वजन घटणे अशी लक्षणे दिसून येतात. जंताचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी फेबेंडाझॉल ५ मि. ग्रॅम किंवा अलबेंडाझॉल ७.५ मि. ग्रॅम प्रति किलो वजनास या प्रमाणात औषध देण्यात यावे. |
| **टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.** | | |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |